ISSN - 0378 - 6463

किंमत २५ रुपये

आयुर्विद्या

Peer Reviewed Indexed
Research Journal
of 21st Century
Dedicated to Ayurved...

Ayurvidya

Ayurvidya Masik

।। श्री धन्वंतरये नम: ।।

राष्ट्रीय शिक्षण मंडळ, संचालित

आयुर्विद्या

मासिक

ISSN - 0378 - 6463

Rashtriya Shikshan Mandal's

AYURVIDYA

Magazine

शंखं चक्रं जलौकां दधतमृतघटं चारुदोर्भिश्चतुर्भि: ।
सूक्ष्मस्वच्छातिहृद्यांशुकपरिविलसन् मौलिमम्भोजनेत्रम् ।।
कालाम्भोदोज्वलाङ्गम् कटितटविलसच्चारुपीताम्बराढ्यम् ।
वन्दे धन्वन्तरिं निखिलगदवन प्रौढदावाग्निलीलम् ।।
नमामि धन्वंतरिमादिदेवं सुरासुरैवन्दितपादपङ्कजम् ।
लोके जरारुग्भयमृत्युनाशनं धातारमीशं विविधौषधीनाम् ।।

To know latest in "**AYURVED**" Read "**AYURVIDYA**"
A reflection of Ayurvedic Researches.

ISSUE NO. - 10 **MARCH - 2021**

PRICE Rs. 25/- Only.

"Ayurvidya" Extends Welcome To All Delegates Of National Seminar On Ayurvedic Management Of Infertility (Vandhyatva)

CONTENTS

"**AYURVIDYA**" Magazine is printed at 50/7/A, Dhayari - Narhe Road, Narhe Gaon, Tal. - Haveli, Pune -41 and Published at 583/2, Rasta Peth, Pune 11.
By Dr. D. P. Puranik on behalf of Rashtriya Shikshan Mandal, 25, Karve Road, Pune 4.

About the Submission of Article and Research Paper

Rashtriya Shikshan Mandal's
AYURVIDYA
Magazine

- The article / paper should be original and submitted **ONLY** to "**AYURVIDYA**"
- The **national norms** like Introduction, Objectives, Conceptual Study / Review of Literature, Methodology, Observations / Results, Conclusion, References, Bibliography etc. should strictly be followed. Marathi Articles / Research Paper are accepted at all levels. These norms are applicable to Review Articles also.
- **One side Printed copy** along with PP size own photo and fees should be submitted at office by courrier / post / in person between **1 to 4 pm on week days and 10 am to 1 pm on Saturday.**
- "**AYURVIDYA**" is a peer reviewed research journal, so after submission the article is examined by two experts and then if accepted, allotted for printing. So it takes atleast one month time for execution.
- Processing fees Rs. 1000/- should be paid by cheque / D.D. Drawn in favour of "**AYURVIDYA MASIK**"
- **Review Articles may be written in "Marathi" if suitable as they carry same standard with more acceptance.**
- **Marathi Articles should also be written in the given protocol as -**

प्रस्तावना, संकलन, विमर्श / चर्चा, निरीक्षण, निष्कर्ष, संदर्भ इ.

Write Your Views / send your subscriptions / Advertisements

To

Editor - AYURVIDYA MASIK, 583 / 2, Rasta Peth, Pune - 411 011.
E-mail : ayurvidyamasik@gmail.com
Phone : (020) 26336755, 26336429 **Fax :** (020) 26336428
Dr. D. P. Puranik - 09422506207 Dr. Vinaya Dixit - 09422516845
Dr. Apoorva Sangoram 09822090305

Subscription, Article Fees and Advertisement Payments by Cash / Cheuqes / D. D. :- in favour of

Payable at Pune Date : .....

Pay to **"AYURVIDYA MASIK"**

Rupees .....

..... Rs. .....

(Outstation Payment by D. D. Only)

- **For Online payment - Canara Bank Syndicate, Rasta Peth Branch, Savings A/c. No. 53312010001396, IFSC - CNRB0015331, A/c. name - 'Ayurvidya Masik'.** Kindly email the payment challan along with name, address and purpose details to **ayurvidyamasik@gmail.com**

"AYURVIDYA" MAGAZINE Subscription Rates : (Revised Rates Applicable from 1st Jan. 2014)

For Institutes -Each Issue Rs. 40/- Annual :- Rs. 400/- For 6 Years :- Rs. 2,000/-

For Individual Persons - For Each Issue :- Rs. 25/- Annual :- Rs. 250/- For 6 Years :- Rs. 1,000/-

ADVERTISEMENT RATES

Full Page - Inside Black & White - Rs. 1,600/- (Each Issue)
Half Page - Inside Black & White - Rs. 900/- (Each Issue)
Quarter Page - Inside Black & White - Rs. 500/- (Each Issue)

Attractive Packages for yearly contracts

संपादकीय

Dealing with Infertility

Dr. D. P. Puranik

Infertility i.e. absence of ability to produce offspring is a Global problem. Infertility is found in both males as well as females. According to survey this problem is found more in urban than in rural areas. In the world, infertility affects about 15 percent couples which amounts to 48.5 million couples. In United States about 9% men and 11 percent women have infertility problem. In India, about 10 to 14 percent couples are known to face infertility problem. One out of six couples has this problem and nearly 27.5 million couples are trying to get conceived.

Infertility has great social impact and so, the problem becomes serious to take cognizance. Problem affects individuals as well as it has social impact also. Women are more affected. Distress, depression, anxiety, reduced self esteem, reduced libido, somatic complaints are very common in women. On many instances they have to face sense of blame and guilt from society. Both the individuals are likely to get Psychological and emotional disorders, frustration, hopelessness, feelings of worthlessness and consequences including turmoil. Some times these couples have to undergo social isolation causing difficulty in interacting with family and friends. Unfortunate infertile women may experience even domestic violence, loss of social status, ostracized marital lives. The couple partners loose their romantic relationship and create conflicts in between them.

Common etiological causes of infertility in males are abnormal sperm counts or function due to Undescended testicles, varicocele, Genetic defects, Health problem like Diabetes, STD etc. In females common causes of infertility are old age, Polycystic Ovary Syndrome (PCOS), Endometriosis, fallopian tube abnormalities, or Uterine abnormalities, cultivation of bad habits like heavy smoking, excessive alcohol consumption, poor nourishment, over weight, under weight, are also known causes.

Infertile women may experience chr. pain in pelvis, painful sex, irregular menstrual periods or heavy and painful periods, back pain, nausea, symptoms of hormonal fluctuations.

Lots of treatment modalities are recommended by different medical disciplines. The principles of treatrnent 1) Remove cause. 2) Counselling of both partners 3) Surgery if required 4) Medicine. Treatment in the males consists of 1) Surgery for varicocele. 2) Treatment of infections 3) Treatment of intercourse problem 4) Hormonal treatment / Medication 5) Assisted reproduchive technology. Medicines for males - Clomid. (Clomiphene citrate) - Raises sperm count. Vitamins - B, C, Calcium, D, E, folic acid etc. Treatment in females consists of - 1) Correction of cause - PCOS, Tubal block, Endometriosis 2) Artificial insemination, 3) IVF. 4) Medication - Drug of choice - Clomid (clomiphene citrate) - To stimulate ovulation, Nourished diet, Vitamins, Calcium. But most important is counselling of couple.

Ayurved along with Yoga also has been proved to be the better discipline giving better results, claiming 90% success rate. Treatment Modalities which are

recommended are - 1) Panchakarma - which helps to eliminate Ama which corrects Agni to result in healthy Ojas. 2) Vajikaran drugs (Aphrodisiac) - These drugs include Shatavari, Ashwagandha, Kapikacchu, Guduchi, Banyantree bark, Phalaghruta, etc. Semen purifying drug like Kushtha along with sugarcane is also recommended. Counselling of both partners for psychological support is recommended. Yoga therapy also useful for physical and mental fitness.

It has been found that whenever modern treatment has failed, Ayurved and Yoga therapy has yielded successful results. And so, it can be said that if Infertility problem is treated with holistic approach unfortunate couples will be happy in their life.

अनपत्यता - निदान वैविध्य

वैद्य रेणुका महेश कुलकर्णी,
स्त्रीरोग तज्ज्ञ,
वैद्य रेणुकाज् आयुर्वेद व पंचकर्म क्लिनिक, पुणे.

वैद्य हर्षवर्धन महेश कुलकर्णी,
एम.डी. स्नातक (स्वस्थवृत्त),
आकुर्डी आयुर्वेद कॉलेज, पुणे.

डॉक्टर तुमचा पेपरमधील लेख वाचला आणि आता शेवटची आशा म्हणून तुमच्याकडे आले आहे, असे म्हणून समोर फाईल चा गठ्ठा टेबलवर ठेवला आणि रडायला लागली. अशावेळी समोरच्याच्या भावनांचा निचरा होणे गरजेचे असते म्हणून मी शांतपणे तिच्यासमोर बसून राहिले. थोड्या वेळाने ती सावरली, जरा शांत झाली.

झाले असे होते की ती फक्त ३१ वर्षाची होती, शेवटचे ICSI (मे २०१८) मध्ये fail झालेले. त्यापूर्वी तिचे ३ IUI आणि २ IVF fail झाले होते, तिच्या स्त्री बीजापासून तिला आता दिवस राहणे शक्य नाही म्हणून egg donor घ्यायचा किंवा surrogacy करावी म्हणून आधुनिक वैद्यकाकडून सांगितले होते.

donor egg घेण्यापेक्षा मी दत्तकच घेत ना मग. हा तिचा प्रश्न अगदी रास्त होता. लग्नाला केवळ चार वर्षे झालेली होती आणि तिचे ७ वेळा Induction करून ovulation monitoring करून झालेले होते, वारंवार IUI, IVF केल्याने AMH<०.५ हा होता, excessive thin endometrium, follicle size not increasing, Sr. prolactin वाढलेले अशी एकूण परिस्थिती होती.

ही रुग्णा २३ जूनला आयुर्वेद उपचारासाठी आली आणि २८ नोव्हेंबरला तिची UPT positive आली तेही तिच्याच स्त्री बिजावर, आज तिला अतिशय हुशार आणि तितकाच मस्तीखोर असा मुलगा आहे. आहे ना हा जोर का झटका!! अजून एक अतिशय महत्वाची गोष्ट इथे नमूद करावीशी वाटते, या रुग्णेचा दिवस राहातानाचा Endometrial thickness हा फक्त ५.९ mm होता आणि efollicle size 13 mm चा होता. आधुनिक शास्त्राप्रमाणे ९-१२ mm हवा आणि follicle size कमीत कमी २०-२२ mm असायला हवा. इथे size, quantity चा विचार न करता, Quality (स्त्री बीज, endometrium) ह्यांचा आयुर्वेदानुसार विचार केला आणि धन्वंतरी कृपेने यश मिळाले. वरील केस मध्ये modern parameters जरी लिहिले असले तरीही निदान आणि चिकित्सा हे पूर्णपणे आयुर्वेदिक आहे.

हे सगळे आपल्या आयुर्वेदाचेच यश आहे. आयुर्वेदाने उशीर result येतात हा मोठा गैरसमज आहे एक ते सहा महिन्यात गर्भधारणा झालेल्या अनेक यशस्वी केसेस आहेत. या सर्व चिकित्सा यशस्वी होऊन मुल झालेल्या, आधी वंध्यत्व म्हणून शिक्का बसलेल्या केसेस समोर घेऊन विचार केला असता लक्षात आले की या रुग्णा वंध्या नव्हत्याच तर त्यांना गर्भधारणा उशिरा झालेली होती. उशिरा गर्भधारणेची कारणे चरक शारीरस्थान अध्याय दोन सातव्या श्लोकात सांगितलेली आढळली.

योनिप्रदोषान्मनसोऽभितापाच्छुक्रासृगाहारविहारदोषात्।
अकालयोगाद्बलसङ्क्षयाच्च गर्भ चिराद्विन्दति सप्रजाऽपि।। (च.शा. ३/७)

सर्व प्रथम वैद्याला काय चिकित्सेचे (काय-अग्नि) सम्यक् ज्ञान असावे. रुग्णेचे पूर्ण अष्टविध परीक्षण, उदर परीक्षण, स्तन व योनी परीक्षण (दर्शन, स्पर्शन, प्रश्न), P/V (विवाहित असेल तरच) त्यातून समजलेली दोषदूष्यसंमूर्च्छना, कोणत्या गुणांनी दोष वाढले आहेत याचा अंशांश विचार पांचभौतिक गुणांचा झालेला परिणाम, पूर्वी झालेले मोठे आजार, पूर्वी केलेल्या उपचारांचे दुष्परिणाम, तयार केलेले hormonal imbalances, परिणामी शरीराचे बिघडलेले समत्व, त्याचप्रमाणे क्षारधर्मी, अम्लधर्मी प्रकृती यांचा सविस्तर विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. काही वेळा चुकीच्या आहार विहारातही याची कारणे सापडतात. आयुर्वेदिक पद्धतीने सविस्तर रुग्णेचा इतिहास घेत असतानाच यातील बऱ्याच प्रश्नांची उत्तरे सापडतात. Sr. Prolactin जास्त आहे, PCOD आहे तर काय चिकित्सा देऊ असा विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारला तर उत्तर देता येत नाही. हेतू, निदान आणि चिकित्सा हाच क्रम ठेवला पाहिजे.

आता एक एक मुद्दा क्रमाने बघू.

१) योनी प्रदोषात् – या ठिकाणी योनी म्हणजे त्र्यावर्ता योनी (बाह्य योनिपासून तृतीयावर्त.) योनीचे बाह्य परीक्षण, तिथे असणारे लोम, स्त्राव, गंध, त्वक दुष्टी या घटकांचे परीक्षण करावे. त्यांनंतर P/V करता येणे अत्यंत गरजेचे, P/V करता येत नाही आणि उत्तरबस्ती केली तर व्यापद ठरलेलेच.

ग्रंथात विंशति योनिव्यापद सांगितले आहेत. वीसही योनिव्यापदे ही वंध्यत्वाची कारणे सांगितलेली आहेत.

न हि वातादृते योनि।

कोणताही योनिव्यापाद हा वाताशिवाय होऊ शकत नाही. बस्ती ही वाताची अर्धी चिकित्सा आहे, पण तरीही प्रत्येक वेळेस उत्तरबस्ती हेच उत्तर असू शकत नाही. म्हणून वैद्य हा दृष्टकर्मी असावा. अनपत्यतेचा विचार करताना गर्भसंभव सामग्रीचा विचार करणे अपरिहार्य आहे.

ध्रुवं चतुर्णा सान्निध्यात् गर्भ स्याद्विधीपूर्वकं।
ऋतुक्षेत्राम्बुबिजानां सामुग्र्यात् अन्कुरो यथा।। सु.शा. २/३३

२) मनसोभितापात् – hormones आणि मानस भाव यांचा जवळचा संबंध आहे हे चिकित्सा देताना अनुभवास येते. Pre menstrual वाढलेला चीडचीडेपणा, कारणाशिवाय खूप जास्त रडू येणे अशी लक्षणे दिसून येतात.

Repeated IUI, IVF रुग्ण दवाखान्यात येतात त्यावेळी त्यांना मोठ्या प्रमाणावर hormones दिलेले असतात, त्या स्वतःला अपराधी समजतात, अशा ठिकाणी समुपदेशनाची गरज असते. **सौमनस्यता गर्भजननां।** या श्लोकाप्रमाणे त्यांच्यात सौमनस्यता प्रस्थापित करणे, पती पत्नीमध्ये वाद नाहीत ना हे तपासणे हे वैद्याचे कर्तव्य आहे. असे वाद आढळल्यास चरकोक्त संधानिय गण दोघांनाही वापरावा.

चिंत्यानां चाति चिंतनात्। हे रसवह स्रोतोदुष्टीचे महत्वाचे कारण आहे. या रस धातूचाच उपधातू रज आणि स्तन्य आहे. अतिचिंता करणाऱ्या रुग्णांमध्ये रज आणि स्तन्याची निर्मिती नीट होत नाही असे लक्षात येते. बऱ्याच वेळा IT मध्ये काम करणाऱ्या मुली, स्वभावाने हळव्या असणाऱ्या स्त्रिया, वारंवार गर्भपात होणाऱ्या स्त्रियांमध्ये चिंता या मुद्द्याचा विचार करावाच लागतो. थोडक्यात रुग्ण रुग्णेच्या ठिकाणी बाहेरच्या कामकाजाचा तणाव, आर्थिक तणाव, कौटुंबिक ताणताणाव आणि रुग्णेचे सत्व कसे आहे, याचा विचार करावा.

३) शुक्र असृक् दोषात्– आयुर्वेद शास्त्रानुसार शुक्र धातूचे परीक्षण करण्यासाठी एक स्वतंत्र आयुर्वेदिक patho-Lab असावी असे वाटते. दरवेळेस Sperm count, motility, abnormality हे निकष तोकडे पडतात असे वाटते, त्याच बरोबर पुरुष रुग्ण जर व्यसन करत असतील तर त्याच्या उष्ण तीक्ष्ण, व्यवायी–विकासि विषारी गुणधर्मामुळे शीत सौम्य असणाऱ्या शुक्र धातूवर लगेचच परिणाम होताना व्यवहारात आढळतो. तसेच अतिचिंता करणाऱ्या पुरुष रुग्णांमध्येही शुक्राच्या गुणवत्तेवर परिणाम होतो आणि त्यापासून गर्भ धारणा होत नाही. त्याचप्रमाणे रजाचेही प्रत्यक्ष परीक्षण करून त्यातील वाढलेल्या दोषांचे शमन करून ग्रंथात सांगितल्याप्रमाणे प्राकृत रजाची उत्पती रुग्णेच्या ठिकाणी होईल असे वैद्याने बघावे.

४) आहार दोषात् – या ठिकाणी अग्नीचा आणि मानस भावांचा विचार करणे गरजेचे आहे. अनेक वेळा स्त्रिया अहितकर, असात्म्य विरुद्ध आहार सेवन करतात. Shift duty मुळे विषम वेळा आहार घेतात. Junk food, Pizza, burger यासारख्या रसदुष्टीकर आहार; पाणीपुरी, भेळ, तळलेले सामोसे असा आंबट, तिखट, विदाही, रक्त दुष्टीकर आहार घेतात. बऱ्याचदा स्त्रिया डब्यामध्ये कोरडी पोळी भाजी नेतात, त्यामुळेही रस धातूचे प्रीणन नीट होत नाही. हल्ली वजन कमी करण्यासाठी वेग वेगळी Keto diet, High protein diet अशी Fads आलेली आहेत. यात प्रामुख्याने पनीर, चीज यासारख्या दुग्ध विकृतींच असतात, परिणामी जाठराग्नी मांद्य तयार होते. जाठराग्नी मांद्य असेल तर आमाची उत्पत्ती अधिक होणार. जाठराग्नीमांद्यामुळे धात्वाग्नी मांद्य तयार होतेच. त्यामुळे सार भागापेक्षा मल भागाचेच परीणमन अधिक होते. रस मल कफ, रक्त मल पित्त यांची अधिक उत्पत्ती होते.

सध्या असणाऱ्या हरितक्रांतीमुळे Seedless, Hybrid, कीटकनाशक आणि रासायनिक खतांचा मारा असणाऱ्या धान्ये, भाजीपाला व फळे यांचे सेवनाचाही समावेश सदोष आहारातच करावा लागेल. म्हणूनच अधिकाधिक सेंद्रिय, नैसर्गिक पद्धतीने पिकवलेले धान्य, भाजीपाला खाणे गरजेचे आहे. पिंडी ते ब्रह्मांडी! जे जसे खाल तसेच शरीरात तयार होणार आहे.

५) विहारदोषात् – आहाराची जशी वेगवेगळी fads आहेत तशीच सध्या poweryoga, zumba अशी gym आणि योगासानांचीही fads आहेत. ह्यामध्ये केवळ calories किती burn झाल्या ह्याचाच विचार केला जातो. आयुर्वेदानुसार व्यायाम हा अर्धशक्ती असायला हवा. अमेरिकेत एक ६८ वर्षांची रुग्णा जेवण झाल्यावर दुपारी २ वाजता रोज ५ किमी पळत होती, अशा परिस्थितीत रुग्णाचा आहार आणि विहार विचारणे खूप महत्वाचे वाटते.

रजस्वला परिचर्या, सूतिका परिचर्या पालन न करणे, शरीरातील Biological Clock न सांभाळणे कोणत्याही वेळी उठणे, कधीही जेवणे, कधीही झोपणे, दिवास्वाप, रात्रौ जागरण हे हेतू lockdown मुळे अधिकच वाढलेले दिसून येत आहेत.

अव्यायाम–स्त्रियांची स्वयंपाकघरातील कामे यंत्रामुळे कमी झाल्याने, तसेच ओट्यामुळे उभ्याने काम केल्यामुळे कमरेच्या हालचाली कमी झालेल्या आहेत आणि स्वत:हून योगासने करण्याच्या बाबतीत कंटाळा दिसून येतो.

कोणताही सण आला की लगेच hormonal pills घेऊन

सोयीसाठी पाळी पुढे ढकलायची, बऱ्याच काळ पर्यंत Oral contraceptives, Copper'T' यांचा वापर केल्याने hormonal imbalance तयार केले जातात.

नको असलेली गर्भधारणा टाळण्यासाठी i-pills, MT pills, वारंवार MTP करणे यामुळेही hormonal imbalance शरीरात तयार केले जातात आणि शरीराचे समत्व बिघडते.

६) अकाल योगात् – आयुर्वेदानुसार – पंचविंशे ततो वर्षे पुमान नारी तु षोडशे । हे समत्वागत वीर्याचे लक्षण सांगितले आहे. करियर करण्याच्या नादात हे २०,२१ वय टाळून सध्या २८,३० पर्यंत लग्न केले जाते, त्यानंतर एक दोन वर्षे planning. म्हणजे सध्याची स्त्री तीस वर्ष वय झाल्यावरच अपत्याचा विचार करते आहे. त्यावेळी पुरुषांचे वय साधारणपणे ३५ तरी असतेच. Late Marriages मुळे स्त्री पुरुष बीजाचा होणारा संयोग अकालीच मानावा लागेल.

बऱ्याच वेळा स्त्रियांची रजप्रवृत्ती नियमित नसते त्यामुळे स्त्रीबीज नेमके कधी तयार होते आहे हे कळत नाही. स्त्रीबीज तयार झालेले नसताना व्यवाय घडला तर त्यातून अपत्यप्राप्ती होते नाही. हाही अकाल योग म्हणावा लागेल.

७) बल संक्षयात् – स्त्रीचे शरीर किंवा काही वेळा तिच्या ठिकाणी तयार होणारे स्त्रीबीज गर्भधारणा व्हायला सक्षम नसते.

बऱ्याच स्त्रियांमध्ये पांडू व्याधीमुळे बलसंक्षय आढळतो. पांडू व्याधीमुळे प्रायः रस आणि रक्त धातूचेच कार्य बिघडलेले आढळून येते. एका रुग्णेमध्ये माती खाण्याचा इतिहास आढळला. मृद् भक्षणजन्य पांडू आणि कृमीची चिकित्सा दिली, आज तिला तीन वर्षांची मुलगी आहे.

व्यवहारात Tubercular treatment च्या side effect ने बल संक्षय झालेले रुग्ण आढळतात. अशा वेळी वसंत कल्पांचा चांगला उपयोग होताना दिसतो.

आधुनिक उपचार पद्धतीमध्ये त्वरित result मिळावेत म्हणून अतिरेकी hormones वापरुन भराभरा तिची स्त्री बीजे काढून वापरली जातात, परिणामी तिची AMH Value वय लहान असतानाही कमी होते. अशा वेळी Quantity चा विचार न करता, वैद्याने Quality चाच विचार करावा.

ह्यापुढची अवस्था म्हणजे स्त्रीच्या Ovaries कितीही strong hormonal injection दिली तरीही Follicles तयार करतच नाहीत, काही वेळेस अकाली लवकर रजोनिवृत्तीदेखील येते. अशा स्थितीला रुग्णाला आणल्यावर तिला Donor egg घे किंवा Surrogacy कर असा सल्ला दिला जातो. खेदाने असे म्हणावे वाटते की अशा रुग्णांनी सुरुवातीलाच आयुर्वेदिक चिकित्सा घेतली असती तर कदाचित त्यांचावर ही वेळ आली नसती. अधिकाधिक स्त्रियांना सुदृढ आणि सक्षम अशा अपत्यांची प्राप्ती व्हावी अशी भगवान धन्वंतरी चरणी प्रार्थना.

अभिनंदन!

प्रा. डॉ. विनया दीक्षित ह्यांचा सन्मान!

आयुष दर्पण फौंडेशन, डेहराडून, उत्तराखंड या संस्थेतर्फे जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने ७ मार्च २०२१ रोजी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ भारतीय स्त्रियांचा सन्मान करण्यात येणार आहे. या निमित्ताने **"E स्वास्थ्यम् International Conference"** चे आयोजन करण्यात आले आहे. साई आयुर्वेद महाविद्यालय, वैराग, सोलापूर हे या कार्यक्रमाचे सहआयोजक आहेत.

आयुर्विद्या मासिकाच्या सचिव व उपसंपादक **प्रा. डॉ. विनया रविकिरण दीक्षित** यांची संशोधन व प्रकाशन क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून यामध्ये निवड झाली आहे.

आयुर्विद्या मासिक समिती, टिळक आयुर्वेद महाविद्यालय व राष्ट्रीय शिक्षण मंडळातर्फे विनया दीक्षित ह्यांचे हार्दीक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा!

अभिनंदन!

डॉ. आनंद बर्वे ह्यांना ICONS OF HEALTH 2021, PUNE ॲवॉर्ड !

Times of India ह्या माध्यमसंस्थेतर्फे डॉ. आनंद बर्वे ह्यांना दि. २८-१-२०२१ रोजी एका समारंभात मा. डॉ. नीलम गोऱ्हे व पुण्याचे कमिशनर मा. अभिताभ गुप्ता ह्यांचे हस्ते **"ICONS OF HEALTH 2021, PUNE"** पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

डॉ. बर्वे हे टिळक आयुर्वेद महाविद्यालयात कायचिकित्सा विभागात अध्यापक असून शेठ ताराचंद आयुर्वेदीय रुग्णालयात मानद चिकित्सक म्हणून कार्यरत आहेत.

आयुर्विद्या मासिक समितीतर्फे डॉ. बर्वे ह्यांचे हार्दीक अभिनंदन व शुभेच्छा!

Infertility In Obstetric And Gynaecology OPD Practice

Dr. Meenakshi Deshpande, M.B,B.S., M.D. (Obst. Gynaec.) Consultant Obstetrician and Gynaecologist, Vatsalya Hospital, Panmala, Sinhagad Road, Pune 30.

Introduction : Most couples (approximately 85%) will achieve pregnancy within one year of trying, with the greatest likelihood of conception occurring during the earlier months. Only an additional 7% of couples will conceive in the second year. As a result, infertility has come to be defined as the inability to conceive within 12 months. This diagnosis is therefore shared by 15% of couples attempting to conceive. We generally recommend seeking the help of a reproductive specialist if conception has not occurred within 12 months.

Such An Observational Study Was Done In 200 Patients Coming To Private Obstetric and Gynaecology OPD In An Year.

Aims : To determine the approximate percentage of causes of **Infertility** seen in private Obstetric and Gynaecology OPD setup.

Materials And Methods : 200 female patients coming to OPD with wish to conceive and no other complaints or illness were selected for this study .

History and physical examination : Questionaire was prepared and given to the patients, along with the routine history - age, address.

- How long have you been trying to get pregnant?
- How often are you having intercourse?
- How often do you have menstrual cycles?
- H/o menarche and problems of adolescence
- Do you have pain with menstrual periods or intercourse?
- Menstrual problems / irregular cycles / prolonged menses
- H/O pelvic pains / infections / major illness like TB /HIV/ any other medical illness ?
- Specific H/O tobacco abuse / smoking / drinks / drugs / medecines
- Have you been pregnant before?
- What happened with your prior pregnancies?
- Have you had any sexually transmitted infections or abnormal pap smears?
- Do you have any medical problems or prior surgeries?
- Do you have a family history of medical problems?
- In physical evaluation thorough examination of the female partner is carried out

General Examination : Height, weight , BMI , hair distribution, striae, edema, pallor, lymph nodes, any lump anywhere.

Local examination : pubic area inspection , vulval hair and distribution, clitoris, hymenal opening, PSp : discharges, cervical abnormalities, PV e/o vaginitis, size of uterus, tenderness, adnexal tenderness, masses felt, Colposcopy with Paps smear may also be performed.

Special Tests : • **Transvaginal ultrasound-** Ultrasound is an important tool in evaluating the structure of the uterus, tubes, and ovaries. Ultrasound can detect uterine abnormalities such as fibroids and polyps, distal fallopian tube occlusion and ovarian abnormalities including ovarian cysts. Additionally, transvaginal ultrasound affords the opportunity to assess the relative number of available eggs. This measurement is called the antral follicle count and may correlate with fertility potential.

• **Laboratory testing -** Depending on the results of the evaluation discussed above, specific blood tests like Haemogram, BSL f and PP, HBA1C measurements of blood levels of certain hormones such as estradiol and FSH, AMH level, which are related to ovarian function and overall egg numbers; TSH, which assesses thyroid function and prolactin, a hormone that can affect menstrual function if elevated.

• **Hysterosalpingogram (HSG)-** This test is essential for evaluating fallopian tubal patency, uterine filling defects such as fibroids and polyps, and scarring of the uterine cavity (Asherman syndrome). Many uterine and tubal abnormalities detected by the HSG can be surgically corrected.

• **Semen analysis -** The semen analysis is the main test to evaluate the male partner. Four parameters analyzed: **1)** semen volume should be at least 1.5 to 2 ml. A smaller amount may suggest a structural or hormonal problem leading to deficient semen production; **2)** sperm concentration normal concentration should be at least 20 million sperm per 1 ml of semen. A lower concentration may lead to a lower chance for conception without treatment; **3)** sperm motility or movement a normal motility should be at least 50%. Less than 50% motility may significantly affect the ability for sperm to fertilize the egg without therapy; and **(4)** morphology, or shape there are three parts of

the sperm that are analyzed for morphology: the head, midpeice and tail. Abnormality in any of those regions may indicate abnormal sperm function and compromise the ability of sperm to fertilize the egg. Ideally, using strict morphology criteria, a minimum of 5 to 15% normal forms leads to a better ability for sperm to fertilize the egg. An abnormal semen analysis warrants a further evaluation usually by a reproductive urologist.

Observations And Discussion :

The Common Causes of Infertility found were :

1) Ovulation disorders : Was found in 45% of the women. In 20% of these women, hypothyroidism was detected. 10% women were also found diabetic and proper treatment was initiated for these. The most common disorders impacting ovulation include polycystic ovaries, hypogonadotropic hypogonadism (from signaling problems in the brain) and ovarian insufficiency (from problems of the ovary).

2) Advanced maternal age : Was found in 36 % of the women (age limit taken as above 30 years). Historically before the latter 20th century, women were conceiving in their teens and twenties, when age-related abnormalities with the egg were not evident. However, in our modern era, women are delaying child birth until their thirties and forties, which has lead to the discovery of the adverse effect of advanced maternal age on egg function. In fact, female age-related infertility is the most common cause of infertility today. For unknown reasons, as women age, egg numbers decrease at a rapid rate. And as aging occurs, egg quality, or the likelihood of an egg being genetically normal, decreases as well. Hence the ability to conceive a normal pregnancy decreases from when a woman is in her early 30s upto her 40s. A woman is rarely fertile beyond the age of 45. This applies to the ability to conceive with her eggs and not with donor eggs.

3) Uterine fibroids : Was found in 28% of the women .Such cases were further classified as to the position of Fibroids. Out of 28% , 59 % were fundal and subserosal, 35% were intramural and 6 % were submucosal fibroids. In discussion Fibroids are very common (approximately 40% of women may have them) and the mere presence alone does not necessarily cause infertility. There are three types of fibroids: **1)** subserosal, or fibroids that extend more than 50% outside of the uterus; **2)** intramural, where the majority of the fibroid is within the muscle of the uterus without any indentation of the uterine cavity; and **3)** submucosal, or fibroid that project into the uterine cavity. Submucosal fibroids are the type if fibroid that has clearly been demonstrated to reduce pregnancy rate, roughly by 50%, and removal of which will double pregnancy rate. In some cases, simply removing the submucosal fibroid solves infertility. Often, but not always, submucosal fibroids can cause heavy periods, or bleeding between periods. There is more controversy regarding intramural fibroids, where larger ones may have an impact and may necessitate removal. Subserosal fibroids do not affect pregnancy

4) Tubal occlusion (blockage) : Was found in 12% of the women in our study. As discussed previously, a history of sexually transmitted infections including chlamydia, gonorrhea, or pelvic inflammatory disease can predispose a woman to having blocked fallopian tubes. Tubal occlusion is a cause of infertility because an ovulated egg is unable to be fertilized by sperm or to reach the endometrial cavity. If both tubes are blocked, then in vitro fertilization (IVF) is required. If a tube is blocked and filled with fluid (called a hydrosalpinx), then minimally invasive surgery (laparoscopy or hysteroscopy) to either remove the tube or block/separate it from the uterus prior to any fertility treatments is recommended.

5) Endometrial / Cervical polyps: was found in 2% women in our study. Endometrial polyps are finger-like growths in the uterine cavity arising from the lining of the uterus, called the endometrium, These abnormalities are rarely associated with cancer (<1% in a woman before menopause) but polyps can decrease fertility by up to 50% according to some studies. Removal of polyps by the minimally invasive procedure hysteroscopy is associated with a doubling of pregnancy rate. In some cases, simply removing the polyp solves infertility.

6) Male factors affecting sperm function: this was detected to be in 36% of male partners. Male factor infertility has been associated as a contributing factor causing infertility in 40-50% percent of cases, and as the sole cause for infertility in 15-20% percent of cases. If a semen analysis is found to be abnormal, generally it is first repeated to confirm the abnormality. Once confirmed, the male partner is referred to a reproductive urologist, especially if the abnormality is severe. In some cases, the reproductive urologist can improve semen function by recommending certain lifestyle changes, by hormonal treatments, or by surgery. In most cases however, sperm function may not improve and therefore any attempt at pregnancy may require additional treatments or procedures performed by our clinic.

Options include intrauterine insemination

(also known as IUI) or IVF with intracytoplasmic sperm injection (also known as ICSI).

A) Intrauterine insemination is a process by which sperm is washed and prepared for placement into the uterine cavity, therefore bypassing the cervix and bringing a higher concentration of motile sperm closer to the tubes and ovulated egg. At least one open tube is required for IUI, and the sperm abnormality cannot be severe otherwise the sperm will not be able to swim to and fertilize the egg.

B) Intracytoplasmic sperm injection is a process by which semen is washed and prepared for direct injection of one sperm into each egg collected during the IVF process. In order to perform ICSI, an egg is held via a small suction pipette, while one sperm is injected into that egg using a very fine glass needle. This process bypasses the normal fertilization process, which may be compromised due to poor sperm function. The doctor will analyze the semen sample carefully and help you decide if ICSI is an appropriate treatment for you.

7) Endometriosis : Was detected in 4% of the women in our study. It is a condition whereby cells very similar to the ones lining the uterine cavity, or endometrium, are found outside the uterine cavity. It is found in approximately 10-50% of reproductive-aged women and can be associated with infertility as well as pain during intercourse and/or menstrual periods. Endometriosis causes infertility by producing inflammation and scarring, which can result in not only pain but also potentially detrimental effects on egg, sperm or embryo. Endometriosis can only be confirmed by surgery, usually laparoscopy. If endometriosis is found, it can be surgically removed by various methods, and its removal may lead to a decrease in pain as well as improvement in the ability to conceive naturally.

8) Unexplained/other : No cause could be detected in 18% of the women in our study. This was found after full evaluation, wherein the investigations does not reveal the cause of infertility. This normally occurs approximately 15% of the time. Thankfully, even when the cause of infertility is not known, various fertility treatments can overcome the unknown road block that was preventing pregnancy and eventually lead to delivery of a healthy baby.

Treatment Methods :

1) Education and counselling : We strongly believe that educating our patients about the normal process of fertility, problems that affect fertility, and treatment options will empower our patients to make the best choices and decrease their stress level during treatments. Understanding the normal reproductive process is essential in knowing when to seek help. Helping our patients develop a deep understanding of their fertility options will make the process smoother.

2) Medications to induce egg development and ovulation : The medications that help stimulate the ovary to develop mature eggs for ovulation come in two forms: pills taken by mouth and injections. The most commonly prescribed pill to stimulate ovulation (generally of one mature egg) is clomiphene citrate. This pill generally is taken from menstrual cycle days 3 - 7. It works in the following way: Clomiphene is an anti-estrogen. It binds in a part of the brain called the hypothalamus, which is essential in stimulating the ovary to grow and release an egg. When clomiphene binds to estrogen receptors in the hypothalamus, it leads to an increase release of an important signaling hormone called GnRH (gonadotropin releasing hormone). This hormone then binds to another area of the brain called the pituitary gland and leads to the release of FSH (follicle stimulating hormone), a hormone that directly binds to cells in the ovary, leading to egg growth and maturation.

The most commonly prescribed injections that stimulate the ovary are called gonadotropins. The gonadotropins in these formulations are FSH, and in some cases, a combination of FSH and LH (luteinizing hormone). These injections are taken nightly, typically for 5 - 10 days, and act directly on the cells of the ovary to stimulate egg development. Once a follicle containing an egg reaches a mature size, another hormone injection called HCG is often given to mimic the natural LH surge that occurs at the time of ovulation. This leads to the final maturation and release of the egg.

3) Diagnostic ant therapeutic video lapro-hysteroscopy-help in understanding the tubal and adhesions problems and actual treating the women in same sitting.

4) Insemination : Intrauterine insemination, also known as IUI, is a process by which sperm is washed and prepared for placement into the uterine cavity, therefore bypassing the cervix and bringing a higher concentration of motile sperm closer to the tubes and ovulated egg. In order to accomplish this, the semen is washed with a solution safe to sperm and eggs, and then centrifuged to separate motile sperm from immotile sperm and other cells. Those motile and viable sperm are then placed in a very small amount of solution, and then very gently and painlessly injected into the uterine cavity using a very thin, soft, and flexible catheter. At least one

open tube is required for IUI and any sperm abnormality cannot be severe, otherwise the sperm will not be able to swim to and fertilize the egg.

5) In Vitro Fertilization (IVF) : In vitro means "outside the body." IVF is a process whereby eggs are collected and then fertilized by sperm outside the body, in an embryology laboratory. The first IVF baby was born in 1978 in England. Not long after, the United States delivered its first IVF baby and the use of IVF has grown dramatically. IVF was a major breakthrough because it allowed for successful pregnancies in women that were previous deemed permanently infertile, such as when the fallopian tubes are both markedly damaged. IVF involves removal of eggs directly from the ovary, fertilization with sperm in the laboratory, followed by transfer of the embryos directly into the uterus, thereby bypassing the tubes. Although tubal disease was the original indication for IVF, many more indications have developed over the years. These include advancing maternal age, severe male factor infertility (whereby ICSI can be used to fertilize the egg), and endometriosis, amongst many others.

वन्ध्यत्व - आयुर्वेद विचार व व्यवस्था

Dr. Suhas Herlekar, B.A.M.S., M.S. HOD, Dept. of Kaumarbhritya, TAMV, Pune.

Introduction - सर्व सामान्य दाम्पत्यामध्ये प्रजावृद्धी हि स्वभावतः किवा दाम्पत्याच्या स्वकर्मावर अवलंबून असने. ज्यांना स्वभावतः अपत्य प्राप्ती होते असे दाम्पत्य हे धन्य मानले जाते. पण ज्या दाम्पत्यांना स्वभावतः किंवा स्वकर्माने प्रजावृद्धी होऊ शकत नाही अशा दाम्पत्यांना औषधोपचार करावा. वन्ध्यत्व हा व्याधि वर्णन केलेला नाही. परंतु वन्ध्यत्व हे लक्षण म्हणून वर्णन केलेले आहे. योनी रोग व आर्तव दुष्टी या सारख्या विकृत्ती मध्ये हे सामान्य लक्षण आहे.

अर्वाचिन शास्त्राने सुद्धा हा स्वतंत्र व्याधि वर्णन केलेला नाही.[१]

व्याख्या– स्त्री किंवा पुरुषामध्ये गर्भाशय किंवा पुरुषबीज भाग प्रदूषित होतो तेव्हा ती स्त्री व तो पुरुष वन्ध्या जाणावा.[२]

आयुर्वेद शास्त्रामध्ये वन्ध्यत्व दोन प्रकारे वर्णन केलेले आहे. एक जन्मजात व दुसरे चिरात् विन्दती म्हणजे काही दोष दूष्टिमुळे गर्भधारणेस विलंब होणे वन्ध्यत्वाची स्वतंत्र व्याख्या वर्णन केलेली नाही.[३]

वन्ध्यत्वाचे प्रमाण – सर्वसाधारण पणे ८० ते ८५% दाम्पत्यामधे नियमित व्यवाय व कोणतेही गर्भनिरोधक न वापरता गर्भ धारणेची शक्यता एक वर्षामध्ये असते. गर्भधारण क्षमता म्हणजे काय – कोणत्याही दाम्पत्याची गर्भधारण क्षमता हि दोघांच्या गर्भधारण क्षमतेची बेरीज असते. कोणतीही एक व्यक्ती वन्ध्या असू शकत नाही. म्हणजे एकाची गर्भधारण क्षमता कमी असेल तर ती दुसऱ्या कडून समतोल केली जाते. दोघांची अल्प असेल तर चिकित्सेची गरज असते. त्यामुळे वन्ध्यत्वाचा विचार करताना दाम्पत्याचा एकत्रीत विचार करावा.

१) उत्तमगर्भ धारण क्षमता + उत्तम गर्भधारण क्षमता – ६ महिने ते एक वर्षात गर्भधारणा.

२) अल्प गर्भधारण क्षमता + उत्तम गर्भधारण क्षमता–चिरात्विन्दति

३) अल्प गर्भधारण क्षमता + अल्प गर्भधारण क्षमता–चिकित्साहार्य

४) गर्भधाराणक्षमता नाही + गर्भधारण क्षमता नाही – चिकित्साअनाहार्य

हेतु – १) वय – गर्भधारणेच्या दृष्टिने वंयाला अनन्य साधारण महत्व आहे. स्त्रियांच्या दृष्टिने विचार केल्यास गर्भधारण क्षमता हि विशिष्ट वयामध्ये उच्चतम असते. ग्रंथकरांनी वय वर्ष १६/२० वर्षांची स्त्री व २५ वर्षाचा पुरुष गर्भधारणेसाठी योग्य मानले आहेत. स्त्रियांमध्ये गर्भ धारण क्षमता वयाप्रमाणे कमी होते असते.[४]

२) १८ वर्षापुर्वी अपरिपक्व बीज त्यामुळे २४ वर्षापेक्षा निम्मी असते. १८ वर्षापासून २४/२५ वर्षा पर्यंत जास्तीत जास्त क्षमता, २५ वर्षापासून ३० वर्षापर्यंत कमी कमी होत जाते व ३०/३२ वर्षानंतर निम्म्यापेक्षा जास्त कमी होते.

३) स्रोतो दुष्टी – आर्तववह स्रोतस एक स्रोतस असल्याने सामन्य स्रोतसाची दुष्टी लक्षणे किंवा स्रोतसाच्या विद्धत्त्व वन्ध्यत्वास करणीभुत होते.[५]

अतिपवृत्ती – अती रक्त स्राव संग – अवरोध, ग्रंथि, गर्भाशयस्थ ग्रंथि, विमार्गगमन योनि किंवा रजाचे उद्वर्तन.[६] आर्तववह स्त्रोतसाची विद्यता. यासर्व लक्षणामुळे शुक्र व शोणित याच्या संयोगास अडथळा किंवा शुक्र धारण क्षमता कमी होणे, किंवा गर्भ स्थापनेस अडथळा होतो. त्यामुळे अनपत्या किंवा गर्भसाव होते. सोतसाच्या विद्धतेमुळे मैथुन असहिष्णुता आर्तव नाश यामुळे वंध्यत्व होते.

४) आसन – उत्तान आसनामधे शुक्राचे ग्रहाण योग्य प्रकारे होते कारण अपत्य पथाची रचना ही त्या प्रमाणे असते गर्भाशयाचे मुख हे पश्चात बाजूस असल्याने अपत्य पथाच्या पश्चात बाजूस स्रवीत झालेले शुक्र गर्भशयामधे प्रवेशित होते म्हणून.[७] गर्भ धारणे साठी उतान आसन योग्य वर्णन केले आहे.

५) मैथुन विकृती[८] – क्लैब्य, अकाल, सशूल, अनिच्छा, कृच्छ्रता, अयोनि. १० टक्के मैथुन दोष वर्णन केलेले आहेत. या मध्ये क्लैब्य म्हणजे नपुंसकता. अकाली मैथुन म्हणजे ऋतुकाल व रात्रीचा मध्य प्रहर गर्भधारणेसाठी योग्य असा वर्णन केलेला आहे. एकादशी, त्रयोदशी, दिवसाचा कालावधी अयोग्य वर्णन केलेला आहे. सशूल मैथुन, मैथुन अनिच्छा व स्थौल्यामुळे मैथुन कृच्छ्रता मैथुन पूर्व शुक्र स्त्राव हे सर्व मैथुन दोष वन्ध्यत्वास कारणिभूत आहेत. गर्भ धारणेच्या दृष्टिने मैथुन कर्म ४८ तासातून एकदा किंवा आठवड्यातून तीन वेळा एक दिवसा आड करावे. चरक शारीरस्थानामधे आठमध्ये वन्ध्यत्वाचे हेतू वर्णन केलेले आहेत.[९]

योनिप्रदोष /रोग – अपत्याचे मुळ कारण स्त्री असल्याने सर्वसामान्यत: योनि विकृती अपत्याच्या धारणास अडथळा निर्माण करतात. योनीची तीनही आवर्ते साकल्याने किंवा पृथक्त्वाने वन्ध्यत्वास कारणीभूत होतात. म्हणून गर्भ धारणेसाठी अव्यापन्न योनि असावी असे वर्णन केले आहे. एकूण वीस योनि रोग वर्णन केलेले आहेत य सर्वामध्ये वन्ध्यत्व हे सामान्य लक्षण आहे. योनी चिकित्सा महत्व सांगताना शुक्राचे ग्रहण व गर्भाची वृद्धी करण्यासाठी योनिरोगाची चिकित्सा करावी असा उल्लेख आढळतो.[१०]

१) मनसोऽभिताप – मैथून कर्माच्या वेळी मानसिकस्थिती चांगली हवी. अपत्याची इच्छा मनात धरुनच मैथून कार्म करावे. एकांतवास, मानसिक गर्भधारणेसाठी महत्वाचे असते. खालील अवस्थेमध्ये मैथुन कर्म केल्यास गर्भ धारणा होत नाही. अति प्रमाणात जेवण, भुकेलेला, तहानलेला, घाबरलेली, विमना–पुत्रची इच्छा न करणारी, इतर पुरुषांची इच्छा मनामध्ये धरणे, मैथुनाची अति इच्छा[११]. सौमनस्य गर्भकरक.

२) आहार – आहार सर्व दृष्टिने महत्वाचा भाग आहे.[१२] व्याधिचा मुख्य हेतु मिथ्या आहार. रस धातु पासून रज शुक्र निर्माण होतात. मिथ्या आहार व अग्नी मांद्यामुळे दोष व दुष्या दुष्टि होऊन शुक्र व आर्तव दुष्टि होते. रजस्वला अवस्थेमधे आहारासंबधी सांगितलेले नियम पाळावे. हे नियम न पाळल्याने वायु दुष्ट होउन आर्तव व योनि दुष्टि करतो.

३) विहार दोष – विहार म्हणजे याठिकाणी मैथुन कर्माचा विचार करावा विकृत आसनात मैथुन कर्म, अपद्रव्याचा उपयोग करणे व अति मैथुन हे योनि रोगाचे हेतु आहेत. त्याचप्रमाणे विहार म्हणजे दिवस भर करत असलेले काम जास्त कष्टदायक असल्यास त्यामुळे योग्य काळी मैथुन कर्म करण्याची इच्छा होत नाही. रजस्वला अवस्थेमधे विहारा संबधी सांगितलेले नियम पाळावे.

४) आर्तव दुष्टि – शुक्रदोषा प्रमाणे च आर्तवाचे सुद्धा आठ दोष वर्णन केलेले आहेत.[१३] या सर्व दोषा मुळे आर्तवाला अबीजत्व प्राप्त होते. स्राव रुपात्मक आर्तवाच्या लक्षणावरुन बीज रुप आर्तवाचे स्वरुप लक्षात घ्यावे, स्राव रुपात्मक आर्तव गर्भ स्थापनेच्या दृष्टिने महत्वाचे आहे. प्रदुष्ट आर्तव हा योनि रोगाचा एक हेतू वर्णन केलेला आहे.

५) अकाल योग – ऋतुर्नाम गर्भधारण शोणित दर्शनोपलाक्षितो गर्भधारण योग्या स्त्रीणामवस्था विशेषः। कुल्लुकभट

गर्भधारणेच्या दृष्टिने कालाला महत्व आहे. ऋतुचकाच्या दृष्टिने ऋतु काल १२ ते १६ दिवस, दिवस रात्रिचा विचार करता रात्रिचा मध्यानहू काल व तिथिचा विचार करता प्रतिपदा चतुर्थि एकदशी त्रयोदशी सोडून इतर सर्व तिथी/दिवस मैथुन कर्मास योग्य आहेत.

६) बल क्षय – धातु शरीराचे धारण करत असतात. धातू क्षयमुळे रज क्षय व शुक्रक्षय होणे. पांडु राजयक्ष्मा सारख्या व्याधिमध्ये वंध्यत्व हे लक्षण असते. धातु क्षयामधे मैथुन अनेच्छा सुद्धा दिसून येते. **प्रकार –** हारित, माधव निदान व चरक यांनी वन्ध्यत्वाचे प्रकार वर्णन केलेले आहेत. **हारीत–** १) बल्यावस्था २) काकावन्ध्या ३) अनपत्या ४) गर्भस्रावी ५) मृतवत्सा ६) बलक्षय

माधव निदान – चार प्रकार – १) वातज २) पित्तज ३) कफज ४) त्रिदोषज ५) रक्तज ६) भूतज ७) दैवज ८) अभिचारज ९) आदिवन्ध्या. चार प्रकार – १) गर्भ स्राविणी, २) मृतपुत्रिका, ३) कन्याप्रसूता, ४) काकवन्ध्या चरक – अप्रजा, सप्रजा.

निदान करण्याची पद्धत – वन्ध्यत्व हा नाजूक विषय असल्याने त्याचे निदान करण्यासाठी काळजीपुर्वक इतिहास घ्यावा. वयाचा विचार करुन चिकित्सेची तत्परता लक्षात घ्यावी. २० वर्षाच्या आत घाई करु नये. २० ते २५ वर्षा पर्यंत समुपदेशन, आहार, मैथुन प्रशिक्षण, मानसिक स्वास्थ्य. २८ ते ३० वर्षा नंतर योग्य त्या निदान व चिकित्सेचा विचार करावा. प्रथम सल्याच्या वेळी उभयतः दाम्पत्याची मुलाखत घ्यावी.

इतिहास– ● विवाह पूर्वी शक्यतो परिक्षणे करु नयेत.● विवाहा नंतर एक ते दीड वर्षामध्ये गर्भ धारण न झाल्यास परिक्षणे सुरु करावीत. ● वय, व्यवसाय, विवाह इतिहास, पुनर्विवाह इतिहास.

● दोघा मधील शस्त्र कर्माचा इतिहास विशेषत: अधोदारामधील.

● कौटुंबिक राजयक्ष्मा मधुमेह यांसारख्या व्याधिचा इतिहास.

● मैथुनाचा इतिहास – नियमितता, काल, आसन, लक्षणे.

● ऋतुचकाचा इतिहास. यामधे कालवधी, रजस्रावाचे प्रमाण, वर्ण, गंध लक्षणे. योनि रोगाच्या योग्य निदान साठी ऋतुचकाचा इतिहास सविस्तर घ्यावा. ● व्यसन–मद्यपान तंबाखु साराखे पदार्थ पुर्वोत्पन्न व्याधिसाठी सुरु असलेले औषधोपचार.● गालगुंडा सारख्या बाल्यावस्थेतिल व्याधीचा इतिहास ● परिक्षणे– आयुर्वेदीय परीक्षणा मधे स्रोतस परीक्षणे प्रामुख्याने रसवह, रक्तवह अन्नवह, आर्तववह, शुक्रवह व मनोवह स्रोतसाचा विचार करावा. ● स्थानिक परीक्षण – पुरुष – उपस्थ, वृषण ग्रंधि, शुक्र प्रयोगशालीय परीक्षण स्त्रियांमधे योनी परीक्षण यामधे बाह्य योनीचा आकार, वयानुसार असणारे बदल, गर्भाशय मुख, गर्भाशय व गर्भाशय पार्श्व. स्त्री बीज निष्कासन परिक्षण ● कश्यपोक्त योनिचा आकाराचा विचार करावा. "शकटाकृती अपत्यलाभाय ।" ● शरीरभार–अति स्थौल्या व अति कृश हे अष्टो निन्दीता पैकी आहेत. म्हणून शरीराचा भार पहावा.

●अर्वाचिन शास्त्रानुसार ● गर्भधारण योग्य कालाचे लाक्षणिक परिक्षण– अ) प्राकृत चक्र – मासि – मासि २८/३५. ब) प्राकृत रजस्रावकाल ३/५/७ दिवस. क) रजकालापूर्वी आधोदर शूल व स्तन शूल व गुरुता. ड) ऋतुकाळात अल्प श्वेत पिच्छील स्राव अथवा अल्प रक्तसाव. इ) रजकालपूर्वी अल्प ज्वर प्रचिति.

Blood investigations -

Hormonal assay - Female if no ovulation Oligo / Irregular M.C.

FSH, LH, PRL, T3 T4 TSH BSL

HSG Generally in Secondary infertility

• Diagnostic laparoscopy/ Hysteroscopy in Female.

TSH - No influence on fertility

Low - Give HCG ifresponse Hypogonadotropic Hypogonadism No response - Karyotype

TSH - High - Hypothyroidism

If Semen analysis is normal- solve the coital problem

चिकित्सा –

